पाणलोट क्षेत्र विकासाधारित
पडीक जमीन विकास कार्यक्रमाचे
अंमलबजावणीबाबत

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय, क्र.पजवि-१८/२०००/प्र.क्र.९४/जल-१२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक - ५ ऑक्टोबर,२०००.

**वाचावे-**

१) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.पजवि-१८९८/प्र.क्र.१८/जल-१२, दि. १.१०.१९९९

२) ग्राम विकसा प जलसंधारण विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र.पजवि-१८९८/प्र.क्र.१८/जल-१२, दि. ८.५.२०००.

**पार्श्वभूमी-**

शासनाने महाराष्ट्र राज्यातील पडीक / अवनत जमिनीच्या विकासाच्या संदर्भात धोरणात्मक सल्ला देण्यासाठी मा. मंत्री (कृषि व जलसंधारण) यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समितीची स्थापना केली होती. या समितीने प्रस्तुत विषयाचा सखोल अभ्यास करुन शासनास पडीक जमिनीच्या सर्वांगीण विकासासाठी १५ वर्षांचा दूरदर्शी कार्यक्रम पाणलोट क्षेत्र विकासाच्या धर्तीवर राबविण्यासाठी शिफारस केली. तसेच या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने एकात्मिक पडीक जमीन विकासाच्या मिशनची स्थापना करण्याची शिफारस केली आहे.

**शासन निर्णय-**

या उच्चाधिकार समितीच्या शिफारशींच्या आधारे एकात्मिक पडीक जमीन विकास मिशनची त्रिस्तरीय रचना उपरोक्त शासन निर्णय क्रमांक-पजवि/१८९८/प्र.क्र.१८/जल-१२, दि. १.१०.९९ अन्वये करण्यात आली आहे. त्यामध्ये निर्देशिल्याप्रमाणे पडीक जमीन

विकासाच्या कार्यक्रमाच्या राज्यस्तरीय संचालन समिती तसेच अंमलबजावणी व आढावा समिती या समित्या खालीलप्रमाणे गठीत करण्यात येत आहेत:-

**१) एकात्मिक पडीक जमीन विकास मिशन-संचालन समिती-**

| | |
|---|---|
| अध्यक्ष | मा. मुख्यमंत्री |
| सदस्य | मा. मंत्री (जलसंधारण) - कार्याध्यक्ष |
| सदस्य | मा. राज्यमंत्री (जलसंधारण) - उप कार्याध्यक्ष |
| सदस्य | मा. मंत्री (कृषि) |
| सदस्य | मा. मंत्री (फलोत्पादन) |
| सदस्य | मा. मंत्री (पदुम) |
| सदस्य | मा. मंत्री (वने) |
| सदस्य | मा. मंत्री (रो.ह.यो.) |
| सदस्य | मा. मंत्री (वित्त) |
| सदस्य | मा. मंत्री (नियोजन) |
| सदस्य | मा. मंत्री (महसूल) |
| सदस्य | मा. मुख्यसचिव |
| सदस्य | प्रधान सचिव (वने) |
| सदस्य | प्रधान सचिव (वित्त) |
| सदस्य | प्रधान सचिव (नियोजन) |
| सदस्य | प्रधान सचिव (महसूल) |
| सदस्य | सचिव (कृषि) |
| सदस्य | सचिव (पदुम) |
| सदस्य | सचिव (रो.ह.यो.) |
| सदस्य सचिव | सचिव (जलसंधारण) |

मा. मुख्यमंत्री यांच्या अनुपस्थितीत मा. मंत्री (जल) हे समितीचे संचालन करतील.

२. राज्यातील पडीक जमिनीचे पाणलोट विकासाच्या धर्तीवर विकास करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेणे व पडीक जमीन विकास कार्यक्रमाचे सुसूत्रीकरण करण्याची

जबाबदारी हया समितीवर राहील. यादृष्टीने समितीच्या कार्यकक्षेत खालील बाबींचा समावेश राहील :-

१) पाणलोट क्षेत्रासाठी राज्यस्तरावरील व केंद्र शासनाच्या विविध योजनेमधील निधीचे एकत्रिकरण करुन राज्यातील पडीक जमिनीच्या विकासासाठी पाणलोट विकासाच्या धर्तीवर कालबध्द कार्यक्रम तयार करणे व राबविणे .

२) आदर्शगांव योजना, जलसंधारण, रोहयो ,नदी-खोरे प्रकल्प, पश्चिम घाट योजना आदि राज्यस्तरावरील याजना तसेच जवाहर ग्राम समृध्दी योजना (पूर्वीची जरोयो) , आरोयो, राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रम, अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम,एकात्मिक पडीक जमीन विकास कार्यक्रम इ. सारख्या पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाच्या धर्तीवर अंमलबजावणीवर संनियंत्रण ठेवणे व समन्वय साधणे,

३) स्थानिक परिस्थितीनुसार, तांत्रिक निकषानुसार प्राथम्याने पाणलोट/गांवे निश्चित करणे, अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपलब्ध झालेल्या माहितीचा शास्त्रशुध्द उपयोग करुन त्याचा प्रभावी वापर पाणलोट क्षेत्र विकासासाठी करणे.

४) शासनाच्या विविध खात्यामध्ये तसेच स्वयंसेवी संस्थांमध्ये समन्वय राखून पाणलोट क्षेत्राचा विकास घडविण्यासाठी प्रयत्न करणे.

५) पाणलोट विकास कार्यक्रमामध्ये ग्रामस्थांचा/लोकांचा सहभग प्राप्त करुन घेण्यासाठी आवश्यक ती मार्गदर्शक तत्वे, सूचना व धोरणात्मक बाबी निश्चित करणे.

६) प्रत्येक पाणलोटामधील पडीक जमिनीचे वर्गीकरणे करणे, पडीक जमिनीमध्ये प्रकल्पाचे कार्यक्षेत्र निश्चित करणे, पाणलोट क्षेत्र विकासाचा निश्चित आराखडा करण्यासाठी एकात्मिक दृष्टया विवेचन करणे, विकासाचा नियोजनात्मक आराखडा निश्चित करणे

७) पाणलोट विकासामुळे उपलब्ध होणा-या साधनांच्या देखभालीसाठी धोरणात्मक कार्यक्रम निश्चित करणे.

८) प्रकल्पाचे मूल्यमापन करणे व फ़लनिष्पत्ती निश्चित करणे.

संचालन समितीची बैठक वर्षातून किमान दोन वेळा घेण्यात येईल.

२. **एकात्मिक पडीक जमीन विकास मिशन -अंमलबजावणी व आढावा समिती**

अध्यक्ष मा.मुख्य सचिव

सदस्य प्रधान सचिव (नियोजन)

| | |
|---|---|
| सदस्य | प्रधान सचिव (वित्त) |
| सदस्य | सचिव (ग्राम विकास) |
| सदस्य | सचिव (जलसंधारण) |
| सदस्य | सचिव कृषि विभाग, |
| सदस्य | सचिव पदुम (कृषि) विभाग, |
| सदस्य | महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशिक्षण संस्था, पुणे |
| सदस्य | प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर |
| सदस्य | आयुक्त, (कृषि),पुणे |
| सदस्य | संचालक, सामाजिक वनीकरण, म.रा.पुणे. |
| सदस्य सचिव | सहसचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग (जलसंधारण) |

सदर समितीचे कार्य ग्राम विकास व जलसंधारण विभागामार्फत चालविले जाईल. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनांचे धर्तीवर वरील राज्यस्तरीय अंमलबजावणी व आढावा समिती पडीक जमीन पाणलोट विकास कार्यक्रमाचे राज्यस्तरावरील संनियंत्रण पुनर्विलोकन तसेच मुल्यमापन करण्यासाठी त्रैमासिक बैठका घेईल. तसेच त्यासाठी केलेल्या कामांच्या प्रगतीचा आढावा घेऊन स्वयंसेवी संस्थांचा या कार्यक्रमामध्ये सहभाग वगैरे बाबींवर संचालन समितीला पुढील धोरणात्मक निर्णयासाठी अहवाल सादर करेल.आढावा समितीची बैठक आवश्यकतेनुसार वर्षातून तीन ते चार वेळा घेण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(अशोक शर्मा)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपाल यांचे खाजगी सचिव,